परिपत्रक नं. ४८
( जनरल विभाग )

रयत शिक्षण संस्था, सातारा
दि. १६-०३-२०२३

सर्व शाखाप्रमुख ,
रयत शिक्षण संस्था

यांना...

**विषय :- साहित्य खरेदी व शाखेतील रोख शिलकेसंदर्भात महत्वाच्या सूचना**

०१. संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या दि. ०६/०३/२०२३ रोजी भरलेल्या बैठकीतील ठराव नं. १६ अन्वये शाखांनी करावयाची खरेदी व शाखेत शिल्लक ठेवावयाची रोख रक्कम याबाबत खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**अ- साहित्य खरेदी :**

शाखांना लागणा-या साहित्यातील बदल, साहित्याची उपलब्धता, वाढलेल्या किंमती, बाजारपेठेतील स्पर्धा, शाखांना प्रत्यक्ष साहित्य खरेदी करताना येणा-या अडचणी इ.बाबी व शासन नियमावलीतील झालेला बदल यांचा विचार करुन सध्या प्रचलित असलेल्या साहित्य खरेदी कार्यपध्दतीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१) रु.५०००/-पर्यंतची खरेदी दरपत्रक / कोटेशन न मागविता करणेत यावी. मात्र अशा पध्दतीने त्या आर्थिक वर्षात एका वस्तूची खरेदी मुल्य रु.५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

२) रु.५००१/- ते रु.१,५०,०००/-पर्यंतची खरेदी कमीत-कमी तीन विक्रेत्याकडून / पुरवठादार / उत्पादक यांचेकडून सिलबंद कोटेशन (पोष्टाने) मागवून तुलनात्मक पध्दतीने करणेत यावी. मात्र एकाच प्रकारच्या वस्तूचे खरेदी मुल्य आर्थिक वर्षात रु.१,५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) रु.१,५०,०००/-पेक्षा जास्त व ५,००,०००/-रकमेपर्यंतची खरेदी वर्तमानपत्रात जाहिरात देवून टेंडर पध्दतीने करावी.

४) रु.५,००,०००/- पेक्षा जादा मूल्य असलेल्या साहित्याची खरेदी ई-निविदा च्या माध्यमातून खुल्या स्पर्धात्मक पध्दतीने करावी.

. . . पान नं. २ वर . .

**ब- रोख शिल्लक :**

संस्थेच्या माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये व इतर शाखांमध्ये आकस्मित खर्चासाठी यापूर्वी रु. १०००/- पर्यंत रोख रक्कम ठेवली जात होती. सध्याची महागाई विचारात घेता सदर रक्कम शाखेच्या खर्चास अपूरी आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१. १००० पर्यंत विद्यार्थी संख्या असलेली महाविद्यालये :- रु.५,०००/-
२. १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेली महाविद्यालये :- रु. १०,०००/-
३. १००० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेली माध्यमिक विद्यालये व विनाअनुदानीत वसतिगृहे :- रु.२५००/-
४. १०००/-पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असलेली माध्यमिक विद्यालये :- रु.५,०००/-
५. उपरोक्त (१-४) प्रमाणे शिल्लक ठेवण्यात येणाऱ्या रकमेपैकी ५०% रक्कम शाखा किर्द व ५०% रक्कम इमारत किर्दीवर विभागून ठेवणेत यावी.

**०२. साहित्य खरेदीस परवानगी :**

शाखेसाठी साहित्य खरेदी करण्यास कार्यालयाकडे परवानगीची मागणी करताना विद्यालयांनी स्कूल कमिटीच्या व महाविद्यालयांनी महाविद्यालय विकास समितीच्या मान्यता ठरावाची प्रत परवानगी पत्रासोबत पाठवावी.

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रत माहितीसाठी---
१) सहसचिव (माध्य./उच्च), रयत शिक्षण संस्था, सातारा
२) ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा
३) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था

H/paripatrak file/१६/०३/२०२३